# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम–1936 मधील कलम–62(2) अन्वये
**{नगर रचना विभाग}** स्थापन केलेल्या न्यायाधिकरणावर महानगरपालिकेतील नगर रचना विभागातील नगर रचनाकार यांची न्याय सहाय्यक म्हणून नियुक्ती करणेबाबत.

नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम–1936 चे कलम–62(3) मधील तरतूदीनूसार स्थापन केलेल्या न्यायाधिकरणावर न्याय सहायक (निर्धारक) म्हणून नगर रचना आणि मुल्यानिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांची न्याय सहायक म्हणून नियुक्ती शासनामार्फत करण्यात येते.

यापूर्वी शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. नासुप्र–2016/प्र.क्र. 17/नवि–26, दि. 07.08.2017 अन्वये नगर रचना व मुल्यानिर्धारण संचालनालयाच्या खालील दोन न्याय सहायक (निर्धारक) म्हणून नियुक्ती दोन वर्षाकरीता केलेली होती.

1. सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, नागपूर
2. नगर रचनाकार, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

उपरोक्त अधिकाऱ्यांची नियुक्ती दोन वर्षाकरीता असल्याने सदर कालावधी दि. 06.08.2019 रोजी संपुष्ठात आल्याने तद्नंतरचा शासन आदेश शासनामार्फत निर्गमित केलेला नसल्याने सदर न्यायाधिकरणाचे काम जलदगतीने होणाच्या दृष्टीने न्याय सहायकांची नियुक्ती बाबतचा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासने पत्र क्र. साप्रवि/आ.वि./न्यायाधिकरण/7955, दि. 11.07.2022 रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

तसेच नागपूर सुधार प्रन्यास अधिनियमाच्या कलम–62 मधील तरतूदी विचारात घेता, न्यायाधिकरणावरील एक न्याय सहायकाच्या नियुक्तीसाठी नाव नागपूर महानगरपालिकेने सुचवून शासनास व नागपूर सुधार प्रन्यासला कळवावे असे, वरील पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेस कळविलेले आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने तसेच यापूर्वी शासन आदेशाच्या अनुषंगाने सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका यांनी न्याय सहायक म्हणून काम सांभाळले आहे. तसेच नागपूर महानगरपालिकेकडील कामकाज विचारात घेता, आठवडयातून दोन दिवस मा. जिल्हा न्यायालयात उपस्थित राहिल्यास महानगरपालिकेतील कामाचा खोळंबा होत असल्याची बाब विचारात घेता सदर न्यायाधिकरणाचे कामी सहायक संचालक, नगर रचना, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे ऐवजी नगर रचनाकार, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांची न्याय सहायक म्हणून नियुक्ती करणेबाबतची शिफारस करणेचा प्रशासकीय ठराव पारित करून सदर प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करणेकरीता प्रस्तावित आहे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- ६३/मनपा/प्रशासक** **दिनांक :- १०/०८/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त

झालेल्या अधिकारानुसार सहा. संचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम–1936 मधील कलम–62(2) अन्वये स्थापन केलेल्या न्यायाधिकरणावर महानगरपालिकेतील नगर रचना विभागातील नगर रचनाकार यांची न्याय सहाय्यक म्हणून नियुक्ती करणेबाबत.

नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम–1936 चे कलम–62(3) मधील तरतूदीनूसार स्थापन केलेल्या न्यायाधिकरणावर न्याय सहायक (निर्धारक) म्हणून नगर रचना आणि मुल्यानिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांची न्याय सहायक म्हणून नियुक्ती शासनामार्फत करण्यात येते.

यापूर्वी शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. नासुप्र–2016/प्र.क्र. 17/नवि–26, दि. 07.08.2017 अन्वये नगर रचना व मुल्यानिर्धारण संचालनालयाच्या खालील दोन न्याय सहायक (निर्धारक) म्हणून नियुक्ती दोन वर्षाकरीता केलेली होती.

3. सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, नागपूर

4. नगर रचनाकार, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

उपरोक्त अधिकाऱ्यांची नियुक्ती दोन वर्षाकरीता असल्याने सदर कालावधी दि. 06.08.2019 रोजी संपुष्ठात आल्याने तद्नंतरचा शासन आदेश शासनामार्फत निर्गमित केलेला नसल्याने सदर न्यायाधिकरणाचे काम जलदगतीने होणाच्या दृष्टीने न्याय सहायकांची नियुक्ती बाबतचा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासने पत्र क्र. साप्रवि/आ.वि./न्यायाधिकरण/7955, दि. 11.07.2022 रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

तसेच नागपूर सुधार प्रन्यास अधिनियमाच्या कलम–62 मधील तरतूदी विचारात घेता, न्यायाधिकरणावरील एक न्याय सहायकाच्या नियुक्तीसाठी नाव नागपूर महानगरपालिकेने सुचवून शासनास व नागपूर सुधार प्रन्यासला कळवावे असे, वरील पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेस कळविलेले आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने तसेच यापूर्वी शासन आदेशाच्या अनुषंगाने सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका यांनी न्याय सहायक म्हणून काम सांभाळले आहे. तसेच नागपूर महानगरपालिकेकडील कामकाज विचारात घेता, आठवडयातून दोन दिवस मा. जिल्हा न्यायालयात उपस्थित राहिल्यास महानगरपालिकेतील कामाचा खोळंबा होत असल्याची बाब विचारात घेता सदर न्यायाधिकरणाचे कामी सहायक संचालक, नगर रचना, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे ऐवजी नगर रचनाकार, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर यांची न्याय सहायक म्हणून नियुक्ती करणेबाबतची शिफारस करणेचा प्रशासकीय ठराव पारित करून सदर प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**

**प्रशासक**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर**